सं. फौ. ख. क्र. ५८५५/२०१६,
देवगिरी नागरी पतसंस्था
विरुद्ध
रफिक सय्यद
नि. क्र. ५ खाली,

<u>तक्रारदारतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास आरोपीचे वकील श्री पी पी पाटील यांचे मार्फत शपथेवर सुरु -</u>

मी माझी तक्रार व साक्ष शपथपत्र व्यवस्थित वाचले आहे. आमच्या पतसंस्थेने आरोपीला ५१ हजार रुपयांचे कर्ज दिले होते. साक्षीदारास निशाणी क्रमांक ३९ दाखवण्यात आला. निशाणी क्रमांक ३९ मध्ये आरोपीने ५१ हजार रुपयांच्या कर्जाची मागणी केली होती असे कुठेही लिहिलेले नाही. हे म्हणणे बरोबर आहे की कर्ज मागणीच्या अर्जामध्ये जी रक्कम नमूद आहे त्याच्या आधारावर आमची पतसंस्था कर्ज मंजूर करते.

प्रश्नः तुमच्या कर्ज मागणी अर्जामध्ये आरोपीने ५१ हजार रुपयांचे कर्ज मागणी केली होती असे कुठेही लिहिले नाही, तर तुम्ही तुमच्या तक्रार मध्ये व साक्ष शपथपत्रात ५१ हजार रुपये कशाच्या आधारावर लिहिले ?

उत्तरः आरोपीचे ५१ हजार रुपयांचे कर्ज मंजूर झाले होते, त्या अनुषंगाने त्याने वचन चिठ्ठी व करारनामा तयार करून दिला होता आणि कर्जरोख्यामध्ये आरोपीचे थकीत कर्जाचे विवरण आहे त्या आधारे आम्ही आमच्या फिर्याद मध्ये व साक्ष शपथपत्रात ५१ हजार रुपये नमूद केले आहे.

कुठलाही करार दोन्ही पक्षांच्या सहीने होते हे मला माहीत आहे. वचन चिठ्ठी , करारनामा आणि कर्जरोखा हे तीनही एकच कागदपत्र आहे असे आम्ही आमच्या साक्षर पुराव्यात कुठेही नमूद केले नाही. हे म्हणणे बरोबर आहे की वचन चिठ्ठी व करारनामा याच्यावर बँकेच्या कुठल्याही अधिकृत व्यक्तीची सही व शिक्का नाही. निशाणी क्रमांक ३५ बँक रिटर्न मेमो यावर बँकेचा सही व शिक्का नाही. हे म्हणणे बरोबर नाही की बँक रिटर्न मेमो निशाणी क्रमांक ३५ हा मलकापूर बँकेचा नाही.

आमच्या पतसंस्थेची स्थापना १९९८ मध्ये झाली. माझे कला शाखेत पदवीपर्यंत शिक्षण झाले आहे. मी फिर्यादी पतसंस्थेमध्ये सन २००८ मध्ये रुजू झालो. ते बरोबर आहे की मी सन

२००८ मध्ये या पतसंस्थेत कुठल्या पदावर रुजू झालो, याबाबत मी कुठलाही दस्त अभिलेखावर सादर केला नाही. हे बरोबर आहे की मी सन २००८ मध्ये या पतसंस्थेत लागलो तसेच त्यावेळेस मी कुठल्या पदावर लागलो याचा उल्लेख माझ्या शपथपत्रात किंवा तक्रार मध्ये नाही.

हे बरोबर आहे की मूळ ठराव पुस्तिका ही पतसंस्थेकडे आहे. हे बरोबर आहे की संपूर्ण वर्षातील सर्व ठराव त्यामध्ये नमूद असतात. ठराव घेण्याकरिता हजर राहण्याकरिता सर्व सदस्यांना नोटीस पाठवल्या जाते किंवा कसे याबाबत मला सांगता येणार नाही. हे बरोबर आहे की जे लोक त्या ठरावाच्या वेळी हजर असतात त्यांच्या सह्या त्या ठरावावर घेतल्या जातात. हे बरोबर नाही की ठराव मध्ये हजर व गैरहजर लोकांची नोंद घेतल्या जाते. हे बरोबर आहे ठरावांमध्ये अनुमोदक व सूचक यांचे नाव लिहिलेले असते. ठराव मध्ये समर्थन करणारे व विरोध करणाऱ्यांची नोंद घेतल्या जाते किंवा कसे मला सांगता येणार नाही. निशाणी क्रमांक ३३ वरील ठरावांमध्ये अनुमोदक व सूचक यांच्या नावासमोर सह्या नाहीत हे म्हणणे बरोबर आहे. हे बरोबर आहे की निशाणी क्रमांक ३३ वरील ठराव हा मूळ प्रत नाही. निशाणी क्रमांक ३३ वरील ठराव दिनांक ०८.०१.२०११ रोजी घेण्यात आला आहे. हा ठराव घेतला त्यावेळेस मी हजर होतो. हे बरोबर आहे की ठराव मध्ये मी हजर असल्याबाबत नमूद नाही.

हे बरोबर नाही की आमच्या पतसंस्थेत कुठलाही कागद दुसऱ्या विभागात गेला तर त्याची पोच घेतली जाते. हे बरोबर आहे की सदर ठराव मी वाचला व मला तो मिळाला याबाबत ठरावावर कुठली नोंद नाही. मला पतसंस्था व आरोपी यांच्यामध्ये झालेल्या व्यवहाराची संपूर्ण माहिती आहे. आमच्या संस्थेकडे आवक-जावक रजिस्टर आहे. हे बरोबर आहे की निशाणी क्रमांक ३३ वरील ठरावावर आवक जावक क्रमांक नमूद नाही. बाहेरचा कुठलाही व्यक्ती पतसंस्थेकडे अर्ज करतो तेव्हा त्याची आवक जावक रजिस्टर मध्ये नोंद होते किंवा कसे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे बरोबर नाही की कर्ज देते वेळेस कर्ज मागणी करणाऱ्या व्यक्तीकडून आम्ही जे कागदपत्र घेतो त्या सर्वांची नोंद आवक जावक रजिस्टर मध्ये घेतो. कर्ज मागणी करणाऱ्या व्यक्तीकडून कुठले डॉक्युमेंट्स घेतले गेले याची नोंद आवक जावक रजिस्टर शिवाय दुसऱ्या रजिस्टर मध्ये घेतलं जात नाही. हे बरोबर नाही की कर्जा संदर्भात कागदपत्र कुठल्या व्यक्तीने पतसंस्थेकडे आणून दिले याची नोंद कुठेही घेतल्या जात नाही.

हे बरोबर नाही की सदर प्रकरण दिनांक ०८.०१.२०११ रोजीच्या ठरावाप्रमाणे मला अधिकार देण्यात आले, असे मी माझ्या तक्रार मध्ये शपथपत्रात किंवा नोटीस मध्ये नमूद केले

नाही. हे म्हणणे बरोबर आहे की निशाणी क्रमांक ३६ वरील नोटीस मध्ये आरोपीला किती रुपयाचे कर्ज दिले व कशासाठी दिले हे नमूद नाही. सदर नोटीस तयार केली तेव्हा मी हजर होतो. हे बरोबर आहे की नोटीस व माझी सही नाही व मी त्यावेळेस तिथे हजर होतो असा उल्लेख त्या नोटीस मध्ये नाही. हे म्हणणे बरोबर नाही की निशाणी क्रमांक ३६ वरील नोटीस आरोपीला मिळाली नाही. माझ्या साक्ष शपथपत्रातील परिच्छेद क्रमांक ५ मधील मजकूर की आरोपीला नोटीस पाठवली व ती नोटीस मिळाली या संदर्भातील मजकूर बरोबर आहे. हे बरोबर आहे की आमच्या तक्रार अर्जात नोटीस ॲड्रेस लेफ्ट या शेरयानीशी परत आल्याचे लिहिलेले आहे. साक्ष शपथपत्रातील मजकूर तसेच तक्रार अर्जातील मजकूर हे दोन्ही मजकूर बरोबर आहे.

माध्यांमन्नाची वेळ झाली असल्यामुळे उलट तपास पुढील तारखेस तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती

माझे समक्ष

VAIBHAV KISHOR PURI

Digitally signed by VAIBHAV KISHOR PURI
Date: 2025.12.01 11:26:31 +0530

दिनांक २८.११.२०२५

(श्री. वै.कि. पुरी)

८ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

औरंगाबाद.